महाराष्ट्र पोलीस

सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

# पोलीस अधिक्षक कार्यालय
## जि.यवतमाळ

---

**पोलीस स्टेशन उमरखेड परीसरात तलवार बाळगणाऱ्या इसमास घेतले ताब्यात डिटेक्शन ब्रँच(DB) उमरखेड यांची कारवाई**

दि.26/08/2025 रोजी डि बी पथकाला गोपनिय बातमीदारमार्फत माहीती मिळाली की, महात्मा गांधीवार्ड येथील खडकेश्वर मंदीराच्या बाजुच्या गल्ली मध्ये एक इसम हा तलवार घेवुन जात आहे. वरुन मा.पोलीस निरीक्षक शंकर पांचाळ यांचे मार्गदर्शनाखाली, डी बी प्रमुख पोउपनि सागर इंगळे, पोहेका/1186 मधुकर पवार,पोशि/1652 संघशील टेंभरे, चालक/964 आकाश पवार असे रवाना होवुन खडकेश्वर मंदीराजवळ आलो असता मंदीराचे समोरील गल्ली मधुन सिमेंट रोडवर एक इसम हातात तलवार घेवुन जात असतांना आम्ही त्यास थांबवुन आमचा तसेच पंचाचा परिचय देवुन त्यास येथे येण्याचे कारण समजावुन सांगुन त्यास त्याचे नाव गाव विचारले असता त्याने त्याचे नाव प्रशांत राजु बोरकर, वय-27 वर्ष, रा.चौभारा गणेश मंदीर जवळ, महात्मा गांधीवार्ड उमरखेड जि.यवतमाळ असे असल्याचे हेच संशयीत इसम असल्याचा खात्री झाल्याने आम्ही आमची व पंचाची अंगझडती घेवुन सदर आरोपीची अंगझडती घेतली असता त्याचे हातात एक काळ्या रंगाची मॅन असलेली स्टिलची तलवार आरोपीचे हातात मिळुन आली. त्याचे वर्णन खालील प्रमाणे 2000/- रुपये एक स्टिलची तलवार ज्याची स्टिलची गोल मुट व साईडने स्टिलचा पत्रा तलवारीची मुटीसह लांबी 33.5 इंच, मुटीची लांबी 9.5 इंच, मुटीची गोलाई 4.5 इंच, पात्याची लांबी 24 इंच, पात्याची मध्यभागी रुंदी 1.7 इंज व त्यावर दोन्ही बाजुला तीन रेषा व काळ्या रंगाची तीन ठिकाणी स्टिल पट्या असलेली मॅन व तिला वरच्या बाजुने पिवळसर रंगाची साखळी मॅनची एकुण लांबी 30 इंच व मध्यभागी रुंदी 2.2 इंच कि.अं 2000/- रुपये

वरील वर्णनाची तलवार अवैध व विनापरवाना आरोपी नामे प्रशांत राजु बोरकर, वय-27 वर्ष, रा.चौभारा गणेश मंदीर जवळ, महात्मा गांधीवार्ड उमरखेड जि.यवतमाळ यांचे जवळ मिळुन आल्याने पंचासमक्ष मोक्यावर जप्त करण्यात आले. सदर आरोपी विरुध्द शस्त्र अधिनीयम 1959 कलम 4/25 अन्वये पोलीस स्टेशन उमरखेड येथे गुन्हा नोंद करणे चालु आहे.

पोलीस स्टेशन उमरखेड जिल्हा हि अवैध धंदे शस्त्रे बाळगणारे प्रतिबंध असुन यापुढे यासंबंधी माहीती असल्यास सदरची माहीती जनतेने पोलीसाची कोणतीही भीती मनात न बाळगता पुरवावी व पोलीसांना सह कार्य करावे ही विनंती.

सदर कारवाई यवतमाळ पोलीस अधिक्षक श्री कुमार चिंता साहेब,मा.अप्पर अधिक्षक श्री अशोक थोरात साहेब,उपविभागीय पोलीस अधिकारी श्री हनुमंत गायकवाड सा.,पोलीस निरीक्षक शंकर पांचाळ यांचे मार्गदर्शनाखाली पो.स्टे.उमरखेड डी बी प्रमुख पोलीस उपनिरीक्षक सागर इंगळे, पोहेका/1186 मधुकर पवार,पोशि/1652 संघशील टेंभरे, चालक/964 आकाश पवार पो.स्टे. उमरखेड तसेच सायबर सेल यवतमाळ यांच्या मदतीने यशस्वीरीत्या पार पाडली आहे.

जनसंपर्क अधिकारी,
पोलीस अधिक्षक कार्यालय,यवतमाळ